DATE- १६ जानेवारी २०१२

# पकरनाट्टम

मराठी चित्रपटांमध्ये सध्या विविध प्रयोग केले जात आहेत. पूर्वी बंगाली चित्रपटांकडून भारतीय चित्रपटसंस्कृती वाचविण्याची आशा होती. मात्र आता ही आशा मराठी चित्रपटांकडून आहे. मलाही एखाद्या मराठी चित्रपटाचे दिग्दर्शन करायला आवडेल, असे मत पकरनाट्टम या मल्याळम चित्रपटाचे दिग्दर्शक जयराज यांनी आज पत्रकार परिषदेत व्यक्त केले. या चित्रपटाचा पहिला खेळ पुणे आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टीवलमध्ये झाला.

जयराज यांनी या चित्रपटाच्या कथेबद्दल सांगितले की, थॉमस ही या चित्रपटामधील मध्यवर्ती भूमिका आहे. थॉमस हा केरळमधील एका पक्षाचा कार्यकर्ता असतो. त्याच्यावर विरोधी पार्टीच्या एका कार्यकर्त्याचा खून केल्याचा आरोप केला जातो. पण, तो निर्दोष असतो. पुढे त्याच्यावर कोर्टात केस दाखल केली जाते. मात्र त्याच्या पक्षाकडून त्याला कोणतीही मदत मिळत नाही. फक्त त्याची प्रेयसी त्याला निर्दोष सिद्ध करण्यासाठी खटाटोप करत असते. एकूणच आजूबाजूच्या राजकीय व सामाजिक घटनांचा थॉमसच्या आयुष्यावर कसा परिणाम होतो याची ही कथा आहे.

हा चित्रपट पुढील महिन्यात प्रदर्शित होणार आहे. दिग्दर्शक जयराज यांना आतापर्यंत सहा वेळा राष्ट्रीय पारितोषिक मिळाले आहे.

आपला स्नेहांकित,

प्रवीण प्र. वाळिंबे

प्रवीण प्र. वाळिंबे
मीडिया को-ऑर्डिनेटर
९८२२४५४२३४ / ९४०५०३५४५८